# प्रेसनोट दि. २२/१२/२०२१

ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ६४ ठाणे येथील प्राथमिक शिक्षक (सध्या अति. कार्य.मुख्याध्यापक ) (वर्ग–३) यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाच स्विकारतांना ताब्यात घेतले.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | कापुरबावडी पो.स्टे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | आलोसे श्री. एकनाथ पांडुरंग पाटील वय–५३ वर्षे, पद प्राथमिक शिक्षक (सध्या अति. कार्य.मुख्याध्यापक ) (वर्ग–३)ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ६४, ठाणे. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | रु. १२७००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | लाचेचा पहिला हप्ता म्हणुन ५०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांची भाची हिचा दहावीचा १७ नंबरचा अर्ज भरण्याकरिता लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १२,७००/– रू. लाचेची रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २०/१२/२०२१ रोजी तक्रार दिली होती.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०/१२/२०२१ रोजी करण्यात आलेल्या लाचेच्या पडताळणीत वरील नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १२,७००/– रू. लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन ५०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यावरून अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे युनीटने सापळयाचे आयोजन करून वरील लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून ५०००/–रूपयाचा स्विकार करतांना आलोसे यांना दिनांक २१/१२/२०२१ रोजी ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक ६४ ठाणे येथे रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी– मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्कपत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१

२) संकेतस्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in

३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in

४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net

५) टोलफ्री क्र. :– १०६४

६)दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९